## अर्ज नि.क्र.१६ वरील आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज ऋणको याने दाखल करुन असे कथन केले आहे की, लवाद प्रकरण क्रमांक MCX/ARB/5164 A/20 मधील दिनांक ०३.०८.२०२१ रोजी एकतर्फा चौकशी घेवून झालेल्या अवार्ड च्या आधारे रक्कम रुपये ५७,७१,१५२/–वसूल होवून मिळणेकरिता दाखल करण्यात आली आहे. पुढे ऋणको यांचे कथन की, वर नमूद अवार्ड च्या चौकशी कामी ऋणको यास कोणतीही नोटीस पाठविण्यात आली नाही. तसेच ऋणको यास त्याची बाजू मांडण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती. त्यामुळे एकतर्फा चौकशी घेवून पारित करण्यात आलेला अवार्ड ऋणको याच्यावर बंधनकारक नाही. पुढे ऋणकोचे कथन की, प्रस्तुत दरखास्तची नोटीस ऋणको यास प्राप्त झालेली नसतांना धनको याने दिलेला अर्ज नि.क्र. ०८ वरील आदेशान्वये ऋणको विरुध्द दिवाणी प्रक्रिया आदेश २१ नियम ४३ अनुसार जंगम मालमत्ता जप्त करण्याचे आदेश पारित झाले आहेत. तरी अर्ज नि.क्र. ०८ वर झालेला आदेश रद्द होवून ऋणको यास त्याची बाजू मांडण्याची संधी देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

२) प्रस्तुत अर्जास धनको याने त्याचे लेखी म्हणणे नि.क्र.१८ अनुसार दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शविला आहे. धनकोचे कथन की, लवाद यांच्याकडे प्रलंबीत प्रकरणात ऋणको यांना योग्यरित्या नोटीसची बजावणी झाल्यानंतर अवार्डचे आदेश पारित करण्यात आले आहे. पुढे असे कथन केले की, अवार्ड दिनांक ०३.०८.२०२१ रोजी पारित झाला असून दोन वर्षाच्या आत म्हणजेच दिनांक

३१.१०.२०२२ रोजी प्रस्तुतची दरखास्त दाखल करण्यात आली आहे. दरखास्त अवार्ड पारित तारखेपासून दोन वर्षाच्या आत दाखल असल्या कारणाने दिवाणी प्रक्रिया आदेश २१ नियम २२ अनुसार ऋणको यास नोटीस पाठविण्याची आवश्यकता नाही. पुढे धनकोचे कथन की, लवाद यांनी दिनांक ०३.०८.२०२१ रोजी पारित केलेल्या अवार्ड संदर्भात ऋणको याने लवाद आणि सामंजस्य कायदा १९९६ मधील कलम ३४ अनुसार मा. जिल्हा न्यायालयात आव्हान न देता प्रस्तुत दरखास्ती मध्ये हरकत नोंदवली आहे. पुढे असे कथन केले की, अर्ज नि.क्र. ०८ वर पारित झालेला आदेश कायद्यातील तरतुदी अनुसार झालेला आहे. तरी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३) उभयपक्षांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | ..अंशतः होकारार्थी |
| २) | कोणता आदेश ? | ..अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

४) प्रस्तुत संचिकेचे अवलोकन केले असता लवाद प्रकरण क्रमांक MCX/ARB/5164 A/20 मधील दिनांक ०३.०८.२०२१ रोजी पारित झालेल्या अवार्डच्या आधारे रक्कम रुपये ५७,७१,१५२/– ऋणको कडून वसूल होवून मिळणे करिता दाखल करण्यात आली आहे. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, अवार्ड पारित तारखेपासून दोन वर्षाच्या आत प्रस्तुतची दरखास्त दाखल करण्यात

आली आहे. धनको यांनी दिलेले अर्ज नि.क्र. ०८ वरील आदेशान्वये ऋणको विरुध्द नोटीस न पाठविता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम ४३ मधील तरतुदी अनुसार जंगम मालमत्ता जप्ती वारंट पाठविण्यात आले आहे. सदर जंगम मालमत्ता जप्ती वारंटची माहिती ऋणको यास प्राप्त झाल्यानंतर ते न्यायालयात हजर राहून प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. पुढे न्यायालयाचे असे निदर्शनास येते की, ऋणको याने लवाद व सामंजस्य कायदा १९९६ मधील कलम ३४ अनुसार वर नमूद लवाद प्रकरणात पारित झालेल्या अवार्डला मा. जिल्हा न्यायालयात आव्हान न देता या दरखास्त मध्ये त्या संदर्भात हरकत नोंदवली आहे. वास्तविक पाहता पारित झालेल्या अवार्डची कायदेशीर वैधतेची पडताळणी करण्याचा अधिकार या न्यायालयास प्राप्त नाही.

५) पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, लवाद प्रकरण क्रमांक MCX/ARB/5164 A/20 ची चौकशी एकतर्फा झाल्याचे दिसून येत आहे. ऋणको याने प्रस्तुत अर्जाद्वारे उपस्थित केलेले मुद्दे यांचा विचार केला असता त्यास त्याची बाजू मांडण्याची संधी उपलबध करुन देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.१६ अंशतः मंजूर करण्यात आला.

२. ऋणको यास आदेशित करण्यात येते की, लवाद प्रकरण क्रमांक MCX/ARB/5164 A/20 मधील दिनांक ०३.०८.२०२१ रोजी पारित झालेल्या अवार्डला आजपासून ३० दिवसांच्या आत सक्षम न्यायालयात रिव्हीजन/ अपील दाखल करुन

योग्य तो आदेश प्राप्त करुन या न्यायालयात सादर करावा.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम ४३ अनुसार अर्ज नि.क्र.०८ वर पारित झालेला आदेश पुढील तारखेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. ऋणको याने आजपासून ३० दिवसाच्या आत सक्षम न्यायालयाकडून या दरखास्तीचे कामकाजाबाबत स्थगिती आदेश प्राप्त करुन दाखल न केल्यास अर्ज नि.क्र. ०८ वरील आदेशाची अंमलबजावणी करुन घेण्याचा अधिकार धनको यास प्राप्त राहील.

स्वा/–
(अ.अ.शेख)
दिनांक: १४.०२.२०२४ दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मेहकर.

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 14.02.2024
Date of Uploading : 14.02.2024